| | |
|---|---|
| Publication | : Pudhari |
| Date | : 24.05.2019 |
| Page | : 2 |
| Column | : 3-5 |

# गोराईच्या झमजाद पाड्यात ७० वर्षांनी प्रकाश

## मुंबईपासून २० कि.मी.वर आजही अंधाराचे राज्य

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

देशात सध्या विजेवरील वाहनांचे वारे जोरात वाहत आहेत. अशा २१ व्या शतकातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात देशातील काही भागात आजही साधी नियमित वापराची वीज पोहोचलेली नाही. मुंबई महानगरीपासून हाकेच्या अंतरावर असणारा गोराईतील झमजाद पाडा हा त्यापैकीच एक. मात्र, या भागातील अंधार जाऊन तेथील नागरिकांचे दैनंदिन व्यवहार खऱ्या अर्थाने उजळून निघणार आहेत. या पाड्यात आजही वीज नाही. मात्र, आता तेथे अदानी समूहाची वीज पोहोचणार असून कामही सुरू झाले आहे.

झमजाद पाड्याचा भाग हा डोंगराळ आहे. मुंबई महानगरीपासून सुमारे २० किमीत अंतरावर हा भाग येतो. तेथे ७० वर्षांपासून कुटुंबे राहात आहेत. सद्यस्थितीत तेथे ५२ कुटुंबे आहेत. या नागरिकांनी गेल्या ११ वर्षांपासून आपल्या भागात वीज येण्यासाठी मोठा पाठपुरावा, संघर्ष केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश येणार आहे. या विभागातील झमजाद पाडा येथे येत्या काही दिवसांत सर्व यंत्रणा उभारून वीजपुरवठा केला जाणार आहे.

मुंबईतील वीजपुरवठ्याची जबाबदारी अलीकडेच रिलायन्स समूहाकडून अदानी समूहाकडे गेली. आता झमजाद पाडा येथे वीजपुरवठा करण्यासाठी भूमिगत केबल्स आणि वीज उपकेंद्र उभारण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. येत्या मार्च महिन्यापासून झमजाद पाड्यात वीज मिळू लागेल, असे नियोजन करण्यात आले आहे. दुसरीकडे, हे क्षेत्र जिल्हा प्रशासनाकडे असल्याने, वीजपुरवठाविषयक सर्व कार्यवाही पूर्ण होण्यास काही काळ लागू शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.



झमजाद पाड्यातील स्थानिक नागरिकांच्या सहाय्यानेच हे वीजपुरवठ्याचे काम केले जात असून प्रदीर्घ काळानंतर दाराशी विजेचा उजेड येतोय या कल्पनेने येथील नागरिक सुखावले आहेत. आजवर विजेअभावी आम्ही जमेल तसे दिवस काढले. आता आमच्या मुलांच्या भविष्यातही सकारात्मक बदल दिसून येईल, असे झमजाद पाड्याचे रहिवाशी ईश्वर किसान नाम म्हणाले. त्यांना हा आयुष्यात घडणारा मोठा बदल वाटतो.

### यापूर्वी घारापुरीही उजळली...

गोराईतील हॅम्लेट विभागाप्रमाणेच ऐतिहासिक एलिफंटा गुंफा असणाऱ्या घारापुरी भागातही कायमस्वरूपी वीजपुरवठा होत नव्हता. तो फेब्रुवारी २०१८ मध्ये सुरु झाला. हे मुंबई शहरापासून समुद्रात सुमारे १० किमी अंतरावर असणारे एक बेट आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये या ठिकाणाचा समावेश होतो. स्वातंत्र्यानंतरची पुढील सर्व दशके घारापुरीत वीज पोहोचली नव्हती.